# प्रेसनोट

## पोलीस स्टेशन गणेशपेठ येथील पोलीस हवालदार यांचेविरूध्द **A.C.B.** नागपूर पथकाने केली कारवाई

अॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे पोलीस विभागात कार्यरत असून ते कर्तव्यावर असतांना तक्रारदार यांचा अपघात झाल्याने त्यांचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन गणेशपेठ येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचा तपास हा पोलीस स्टेशन गणेशपेठ येथील पोलीस हवालदार श्री अतिष निकोडे यांनी केलेला होता. तक्रारदार यांनी अपघातात नुकसान भरपाई मिळण्याकरिता मा. न्यायालयात केस दाखल केली होती. त्याकरिता त्यांना अपघाताच्या गुन्हयाची दोषारोपपत्राची प्रत ची आवश्यकता होती. नमुद गुन्हयाची दोषारोपपत्राची प्रत मिळण्याकरिता तक्रारदार हे पोलीस हवालदार श्री अतिष निकोडे यांना जावून भेटले असता पोलीस हवालदार श्री अतिष निकोडे यांनी तक्रारदार यांना ३०००/-रु. लाचेची मागणी केली. तक्रारदारास लाच दयायची नसल्याने तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर कार्यालयात तक्रार केली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी लाचेच्या मागणीबाबत पडताळणी कार्यवाही केली असता दिनांक ०१/०७/२०२६ रोजी यातील आलोसे पोलीस हवालदार श्री अतिष निकोडे, पोलीस स्टेशन गणेशपेठ यांचेकडे लाचेच्या मागणीबाबत पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांना चार्जशिट ची प्रत देण्याकरिता ५०००/-रु. लाचेची मागणी करुन पहिला हप्ता ३०००/-रु. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यावरुन आलोसे पोलीस हवालदार श्री अतिष निकोडे यांचेविरुध्द पोलीस स्टेशन गणेशपेठ, नागपूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक महेश भोरटेकर सापळा पथक पोलीस निरीक्षक श्री जितेंन्द्र वैरागडे, पोहवा आशिष वैद्य, विलीन तांबडे, पोशि होमेश्वर वाईलकर, प्रफुल भातुलकर, स्वाती हिंडोरिया चालक पोहवा राजेंन्द्र जांभुळकर यांनी केलेली आहे.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथील खालील क्रमांकावर संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करुन दिले जाईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**


१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
२. टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सअॅप क्र. ९०६७६७१०६४
३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
६. श्री. राजीव कर्मलवार ,वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०